# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक ०२.०९.२०२६ बुधवार**

**१) मा. न्यायालयातुन आरोपींना आजन्म कारावासाची शिक्षा :—**

दिनांक ०२.०९.२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश—१६, नागपुर श्री. मोहतेसिम बदर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ७७/२०२१ मधील, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील अप. क्र. २१०/२०२० कलम ३०२, १२०(ब) भा.दं.वि., सहकलम ४, २७ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. या गुन्ह्यातील आरोपी १) रितीक धन्नुप्रसाद माझी, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. ५८५, आशिर्वाद नगर, २) कुणाल नारायण बचेरे, वय २४ वर्षे रा. न्यु अमर नगर, ३) गोपाल उर्फ गोलु कमलेश त्रिवेदी, वय २१ वर्षे, रा. भोलेनगर, पिपळा, ४) निरंजन उर्फ तुक्या विजयराव सावळे, वय २० वर्षे, रा. न्यु प्रेरणा नगर यांचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपींना कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येकी १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ४, २५ भा.ह.का. अन्वये ०२ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व प्रत्येकी ५,०००/—रू. दंड व दंड न भरल्यास ०६ महीने कारावासाची शिक्षा ठोठावली.

दिनांक ०४.०६.२०२० चे १८.०० वा. सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे वैभव सुरेश मुर्ते, वय ३४ वर्षे, रा. प्लॉट नं. २९, भोले नगर, गुरूप्रसाद लॉनमागे, हुडकेश्वर, नागपुर यांना आरोपी क्र. ०२ याने उधारीचे पैसे परत करण्याचे बहाण्याने त्यांना पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत पडोळे सभागृह येथे कट रचुन, बोलावुन, सभागृहाचे लोखंडी प्रवेश द्वाराजवळ आरोपींनी संगणमताने फिर्यादीचे भावाचे डोळ्यात मिरची पावडर फेकली व त्यांना तलवार व कुऱ्हाडीने वार करून जिवे ठार केले. फिर्यादी सुमंत सुरेश मुर्ते, वय ३६ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपींना दिनांक ०५.०६.२०२० रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्ह्याचे तपासी अधिकारी तत्कालीन सपोनि. सत्यवान बि. कदम यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री. रवि आष्टनकर व श्रीमती कांती शेख मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. जलतारे व चेतन ठाकुर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. किर्ती फुकट व मपोहवा. सोनु यांनी काम पाहिले.

**२) उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार तसेच, वरिष्ठ श्रेणी लिपीक व प्रामाणिक ऑटो चालक यांचा मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते गौरव :—**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी पोलीस आयुक्तालय अंतर्गत येणारे पोलीस ठाणे हिंगणा, हुडकेश्वर येथील उत्कृष्ट तपासकाम करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच, वरिष्ठ श्रेणी लिपीक व प्रामाणिक ऑटोचालक यांचा आज दिनांक ०२.०९.२०२६ रोजी पोलीस भवन येथील कॉन्फरन्स हॉल येथे पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

ज्यामध्ये पोलीस ठाणे हिंगणा येथे दाखल घरफोडीचे गुन्ह्यातील आरोपीस अटक करुन त्याचेकडून ०६ घरफोडी व ०१ वाहनचोरी असे एकुण ०७ गुन्हे उघडकीस आणुन, गुन्ह्यातील २,४७,९३३/—रू. चा मुद्येमाल हस्तगत केला. गुन्हयाचा तपास करणारे वपोनि. जितेंद्र बोबडे, पोउपनि. संतोष राठोड, पोहवा. कैलास चव्हाण, अरूण कांबळे, पोअं. अतुल तलमले, कार्तीक हेडाऊ, अनिल झाडे व प्रविण बंड यांनी तसेच, पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे दाखल जबरी चोरीचे गुन्ह्याचे तपासादरम्यान, फिर्यादीने खोटी तक्रार दिल्याचे व गुन्हा घडलाच नसल्याचे निष्पन्न करून उत्कृष्ट काम करणारे वपोनि. श्रीमती अनामिका मिर्झापुरे, सपोनि. पपीन रामटेके, पोउपनि. सुमेधकुमार जाधव, पोहवा. मुकेश कन्हाके, पोअं. ऋषभ ठाकरे यांनी तसेच, दिनांक ०१.०९.२०२६ रोजी पोलीस ठाणे कळमना येथील पोहवा. संदेश शुक्ला व पोअं. ठाकुर आडे यांनी पेट्रोलींग दरम्यान मिळालेल्या सुचनेवरून एका ईसमास गळफास घेण्यापासुन परावृत्त केले व त्याचे प्राण वाचविले. त्याचप्रमाणे, सामान्य शाखा येथील वरिष्ठ श्रेणी लिपीक श्री. भास्कर राऊत यांनी नागपुर शहर पोलीस दलाचे जमीनीबाबत व त्यावरील ईमारतीचे बांधकाम याबाबत सुसंगत माहीती सादर केली. तसेच, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत तक्रारदार महीलेची ४,७५,०००/—रू. चा मुद्देमाल असलेली बॅग एका प्रामाणिक ऑटोचालक नामे सचिन मोतीरामजी निखारे, वय ४० वर्षे, रा. विनोबा भावे नगर, गल्ली नं. १० यांनी निस्वार्थ व प्रामाणिकपणे पोलीस ठाणे येथे आणुन तक्रारदार महीलेस तीची बॅग परत केली. अशा सर्व उत्कृष्ट तपासकार्य करणारे व प्रामाणिक ऑटोचालक यांचा पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देवुन गौरव केला.

याप्रसंगी मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी, श्री. राजेंद्र दाभाडे, मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उपआयुक्त (परि.क्र. ०४) हजर होते.





**(कामगिरी)**

**१) सोनेगांव पोलीसांची कामगीरी :— जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

दिनांक ११.०८.२०२६ चे २३.३० वा. ते २३.४० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सोनेगांव हद्दीत, हॉटेल मेमोरेझ समोरील रोडवर सोमलवाडा चौक येथुन शेख अकरम उर्फ भुरू शेख रेहमान, वय ४२ वर्षे, रा. आनंद नगर, सिताबर्डी, नागपुर हा जात असतांना, त्यास जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने एका चारचाकी वाहनाचे चालकाने धडक मारून गंभीर जखमी करून पळुन गेला होता. जखमी यास उपचाराकरीता दाखल करण्यात आले होते. याप्रकरणी पोलीस ठाणे सोनेगांव येथे आरोपीविरूध्द कलम ६१, १०९, २८१, १२५(अ), १२५(ब) भा.न्या. सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासात पोलीसांनी जखमी यास जुन्या वैमनस्यावरून यातील आरोपींनी कट रचुन, जखमी हा घटनास्थळाहुन जात असतांना, त्यांचे ताब्यातील जिप कंपास केपनीचे चारचाकी वाहनाने शेख अकरम यास धडक

देवुन गंभीर जखमी केल्याचे निष्पन्न केले. आरोपींचा शोध घेवून क्र. १) शहबाज खान उर्फ सलमान बिल्ला अहमद खान, वय २५ वर्षे, रा. ताजनगर, मानकापुर २) अमीर बशीर शेख, वय ३५ वर्षे, रा. झिंगाबाई टाकळी, मानकापुर ३) मोहम्मद साहील अन्सारी मोहम्मद अल्ताफ अन्सारी, वय २८ वर्षे, रा. न्यु पार्वती नगर, कळमना, ४) मोहम्मद तौफीक शेख मोहम्मद आरीफ, वय २८ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८९, सिताबर्डी, नागपुर, ५) शेख शरीफ शेख सलीम, वय ३६ वर्षे, रा. तेलीपुरा, बुरडगल्ली, सिताबर्डी, नागपुर यांना अटक करण्यात आली होती. आरोपी नामे ६) शेख मोहसिन उर्फ बाबा टायगर शेख, वय २७ वर्षे, रा. ताजनगर, मानकापुर ७) जावेद खान उर्फ जेडी, रा. कल्पना टॉकीज जवळ, मानकापुर यांचा शोध सुरू आहे.

गुन्ह्यातील आरोपी क्र. ६ पाहीजे आरोपी हा टोळीप्रमुख असुन, इतर आरोपी हे टोळीचे सदस्य आहेत. ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द अनेक गुन्हे केल्याचे निष्पन्न झालेले आहे. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(i)(ii),३(२),३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त, सोनेगांव विभाग करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग), मा. श्री. सिंगारेड्डी ऋषीकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. १) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. राहुल तसरे, दुपोनि. श्रीमती सपना निरंजने, पोउपनि. विक्रांत कारटकर, पोहवा. राजु भोयर, दिनेश खेडकर, विकास टोंग, हिम्मत सहारे, मंगेश गाडगे, मपोहवा. शुभांगी वाघमारे व पोअं. वैभव लबडे यांनी केली.

**<u>२) पोलीस अजनी हद्दीतील कुख्यात गुन्हेगार सुमित रमेश चिंतलवार टोळीविरूध्द मकोका अंतर्गत कारवाई.</u>**

दिनांक २५.०५.२०२६ रोजी अजनी पोलीसांनी पोलीस ठाणे हद्दीत सावित्रीबाई फुले नगर येथे आदित्य तेलगोटे याचे घरी रेड कारवाई केली असता, घराच्या टेरेसवर एम.डी मेफेड्रान पांढऱ्या रंगाचे पावडर २९०.५९ ग्रॅम व ०२ मोबाईल असा एकुण १४,९०,९५०/— रू चा मुददेमाल मिळुन आला होता. पोलीस ठाणे अजनी येथे कलम ८(क),२२(क),२९ एनडीपीएस ॲक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयात जप्त केलेली एम.डी पावडरची मात्रा ही व्यवसायीक स्वरूपाची होती. गुन्हयाचे तपासादरम्यान गुन्हयातील आरोपी नामे १) आदीत्य भिमराव तेलगोटे, वय २३ वर्षे, रा. गल्ली नं ५, सावित्रीबाई फुले नगर, अजनी २) करण सुधिर गटलेवार, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं ०४, श्रध्दा नगर, तुकुम, जि. चंद्रपुर, ३) नरेश उर्फ कांगारू कमलसिंग टेकाम, वय ३२ वर्षे, रा. ग्राम घुटी, ता. लामठा, जि. बालाघाट (मध्यप्रदेश) यांना अटक करण्यात आली असून ते सध्या नागपूर कारागृहात आहेत. तसेच, मुख्य आरोपी नामे सुमीत रमेश चिंतलवार, वय ३२ वर्षे, रा. प्लॉट नं २६, गल्ली नं ०४, विश्वकर्मा नगर, अजनी, नागपुर हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

टोळी प्रमुख सुमीत रमेश चिंतलवार याचेविरूध्द खुन, खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी, शिवीगाळ मारपीट करणे, बेकादेशीर अग्नी शस्त्र बाळगणे, अपहरण, दरोडा, गैरकायद्याची मंडळी जमविणे, अंमली पदार्थ बाळगणे यासारखे गंभीर स्वरूपाचे वेगवेगळे एकुण १२ गुन्हे दाखल आहेत. तसेच, त्याचेवर यापुर्वी ०३ गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई करण्यात आली होती. आदीत्य भिमराव तेलगोटे यांचेविरूध्द गंभीर स्वरूपाचे एकुण ०७ गुन्हे दाखल आहे. आरोपी नामे नरेश उर्फ कांगारू कमलसिंग टेकाम याचेवर ०३ गंभीर गुन्हे दाखल आहेत. आरोपी नामे करण गटलेवार याचेवर अंमली पदार्थ बाळगण्याचा गुन्हा दाखल आहे.

अशाप्रकारे नमुद टोळीविरूध्द एकुण १९ गुन्हे दाखल आहेत. सदरील टोळीमधील आरोपीतांविरूध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करूनसुध्दा त्यांनी त्यांची गुन्हेगारी कृत्य सुरूच ठेवले होते. करिता सदर टोळीविरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई करणेबाबत वरिष्ठांना प्रस्ताव सादर करण्यात आला होता. वरिष्ठांचे आदेशान्वये गुन्ह्यामध्ये महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कलम ३(१)(ii), ३(२) व ३(४) मकोका अंतर्गत कलमवाढ करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास सपोआ. श्री. नरेंद्र हिवरे, (अजनी विभाग) हे करीत आहेत.

संघटित गुन्हेगारी व दहशत निर्माण करणाऱ्या, तसेच अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या समाजकंटकांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची भूमिका नागपूर शहर पोलिसांनी कायम ठेवली असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांची माहिती तात्काळ पोलिसांना द्यावी.

**<u>३) परिमंडळ क्र. ४ अंतर्गत, पोलीस ठाणे अजनी येथील कुख्यात गुंड हद्दपार :—</u>**

पोलीस ठाणे अजनी हददीत **चंद्रमणी नगर, गल्ली नं. १, एनआयटी गार्डन जवळ, अजनी, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे आकाश नरेश रामटेके, वय २४ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे दरोडा, विनयभंग करणे, दुखापत करणे, घरफोडी करणे, धमकी व शिवीगाळी करणे, शस्त्र बाळगणे इत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता अजनी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. श्रीमती रश्मीता राव, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १४/२०२६ दिनांक २९.०८.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतून ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. नमुद गुन्हेगाराचे हद्दपार आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली असुन, अजनी पोलीसांनी नमुद हद्दपार इसमास दिनांक ३०.०८.२०२६ रोजी शिवनी (मध्य प्रदेश) येथे त्याचे नातेवाईक यांचेकडे सोडलेले आहे.

**<u>४) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०१.०९.२०२६ चे १६.३० वा. चे सुमारास, पोलीस आयुक्त एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे तहसिल हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, पाचपावली पहीले रेल्वे फाटक जवळ, टिमकी, विजय मेडीकलचे बाजुचे गोपाल राऊतचे दुकानमध्ये ईजाज शेख नावाचा ईसम ऑनलाईन जुगार खेळवित आहे. अशा माहीतीवरून नमुद ठिकाणी तहसिल पोलीस तथा पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथे आरोपी १) राजेश महादेव नान्हे, वय ५२ वर्षे, रा. जुनी मंगळवारी, २) अरविंद विजय मेश्राम, वय ३५ वर्षे, रा. भांडेप्लॉट, ३) कृष्णा घनशाम अभंगे, वय २५ वर्षे, रा. पाचपावली रेल्वे फाटक, ४) सचिन वामनराव मुराडकर, वय ५० वर्षे, रा. चंदननगर हे कशीनो वर ऑनलाईन पैशाची बाजी लावुन जुगार खेळवितांना आणि ५) अजय नामदेव देवघरे, वय ४५ वर्षे, रा. वैशाली नगर, ६) प्रशांत बबन गजभिये, वय ३८ वर्षे, रा. कुऱ्हाडकरपेठ, ७) रविंद्र विष्णु निनावे, वय ३७ वर्षे, रा. तांडापेठ, ८) वासुदेव पंचमराव बोकडे, वय ५० वर्षे, रा. शोभाखेत, पाचपावली, ९) कार्तिक चिंधुजी कुंभरे, वय ४७ वर्षे, रा. जागनाथ, बुधवारी, १०) मनिष शामलाल मरसकोल्हे, वय ३० वर्षे, रा. मारवाडी चौक, लकडगंज, ११) निखील प्रकाश कुंभारे, वय २७ वर्षे, रा. आवळेबाबु चौक, लष्करीबाग, १२) संदीप चिंतामण सोनटक्के, वय ३५ वर्षे, रा. टिमकी, टोपरेचे विहीजीजवळ हे जुगार खेळतांना समक्ष मिळुन आले. घटनास्थळावरून एकुण १२ ईसमांना ताब्यात घेतले. त्यांचे ताब्यातुन वेगवेगळ्या कंपनीचे कशीनो मशीन, मॉनिटर/प्रिंटर/माऊस/कि—बोर्ड/सिपीयु सह ०६ कॉम्प्युटर, ०६ मोबाईल फोन, रोख २२,४४०/—रू. व ईतर साहीत्य असा एकुण ४,८०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त

करण्यात आला. यातील कसीनो मालक पाहीजे आरोपी नामे १) एजाज शेख, रा. जरीपटका २) प्रकाश मस्के, रा. तहसिल हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता ताब्यातील आरोपी यांना जुगार खेळवतांना मिळुन आल्याने पोलीस ठाणे तहसिल येथे आरोपींविरूध्द कलम ४,५ म.जु.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. सतीष फरकांडे, सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. संदीप भिताडे, पोहवा. विजय गिरी, आशिष गायधने, अर्शद शेख, मनोज निमकर, व दिनेश क्षिरसागर यांनी केली.



**<u>५) पारडी पोलीसांची कामगिरी :— हरविलेल्या मुलीचा तात्काळ शोध.</u>**

दिनांक ०२.०९.२०२६ चे ०७.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे पारडी हद्दीत राहणाऱ्या ०९ वर्षीय अल्पवयीन मुलीला ती शाळेत जात नाही म्हणुन, तीचे आई—वडीलांनी रागावले असता, ती रागाचे भरात शाळेत न जाता इतरत्र कुठेतरी निघुन गेली. तीचे पालकांनी व नातेवाईकांनी मुलीचा परिसरात १०.०० वा. पर्यंत शोध घेतला परंतु ती मिळुन न आल्याने, पोलीसांना सुचना दिली. पारडी पोलीसांनी घटनेची त्वरीत दखल घेवुन, मुलीचा शोध घेतला असता, पोलीस पथकाला ती भवानी नगर येथे मिळुन आली. तीला ताब्यात घेवुन, तीची सविस्तर विचारपूस केली व तीचे समुपदेशन करण्यात आले. मुलीला तीचे पालकांचे ताब्यात सुखरूप देण्यात आले.

वरील कामगिरी मा. श्री. नित्यानंद झा पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, मवपोनि. नंदा मनगटे व त्यांचे पथकाने केली.



**<u>६) पोलीस उपायुक्त परि.क्र. ६ विशेष पथकाची कामगिरी :— अवैध दारूसाठा जप्त.</u>**

दिनांक ०१.०९.२०२६ रोजी, पोलीस उपायुक्त परि.क्र. ६ विशेष पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, धनगवळी नगर, एनआयटी गार्डन, शर्माचे घराजवळ, नारावस्ती येथे राहणारी महीला नामे श्रीमती सरीता भोला

मरावी, वय ४२ वर्षे हिने घराजवळील गार्डनमध्ये रेड कार्यवाही केली असता, तेथे नमुद महीलेच्या ताब्यातुन देशी दारू भिंगरी संत्राच्या ९० मिली च्या एकुण ०६ पेट्या प्रत्येक पेटीत १०० नग असलेल्या व खुल्या पेटीत ०५ नग असे एकुण ६०५ नग देशी दारू एकुण किंमती २४,२००/— रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपी ही स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता अवैधरित्या दारूविक्री करतांना मिळुन आल्याने, तीचेविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपी महीलेस मुद्देमालासह जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रमेश धुमाळ पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ६) यांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांचे विशेष पथकाने केली.



**<u>७) लकडगंज पोलीसांची कामगीरी :— चोरीचे मोबाईल व जिवंत डेटोनेटर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०१.०९.२०२६ रोजी लकडगंज पोलीसांनी गुप्त बातमीदारामार्फतीने मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, आजमशहा चौक येथे चोरीचे मोबाईल विक्री करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ईसमास ताब्यात घेतले. त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने आपले नांव राजेंद्र रामलाल विश्वकर्मा, वय ३५ वर्षे, रा. जि. बालोद, छत्तीसगढ असे सांगीतले. चौकशी केली असता, नमुद ईसम हा डब्ल्युसिएल कोलमाईन्स, वरोरा, चंद्रपुर येथे ठेकेदारा मार्फत काम करीत असल्याचे निष्पन्न झाले व त्यास मजुरीचे पैसे न मिळाल्याचे कारणावरून, त्याने ठेकेदाराचे मोबाईल चोरी करून आणल्याचे व तेथुनच ०२ जिवंत डेटोनेटर घेवुन रेल्वेने नागपुर येथे आल्याचे सांगीतले. त्याचे ताब्यातुन ०३ मोबाईल फोन, ०२ जिवंत डेटोनेटर जप्त केले. डेटोनेटर हे सुरक्षितरित्या बिडीडीएस पथकाकडुन निष्क्रीय/पॅक सिल करून प्रमाणीत केले. डेटोनेटर बाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली, वपोनि. मुकुंद कवाडे, पोउपनि. सागर भंडारी, दिपक पोफळे, सागर शिंदे, पोहवा. पंकज रगतशिंगे, निलेश पोराटे, सुरज मडावी व अरविंद तायडे यांनी केली.

**<u>८) कळमना पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपींना अटक, एकुण ०४ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक २८.०८.२०२६ चे १२.०० वा. ते दिनांक ३०.०८.२०२६ चे १८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कळमना हद्दीत, प्लॉट नं. १५९, कामना नगर, कळमना, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. मनिषा लिलाधर साठवणे, वय ४४ वर्षे ह्या त्यांचे घराला कुलुप लावुन परीवारासह भावाचे घरी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, घरात प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील सोन्याचे दागिने व जुना वापरता मोबाईल असा एकुण किंमती २५,५००/—रू. चा

मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्ह्याचे तपासादरम्यान कळमना पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी १) अभिषेक मुकेश मालवी, वय २० वर्षे, रा. कामना नगर, कळमना, २) लखन उर्फ मिखन नत्थुलाल सोळंकी, वय २५ वर्षे, रा. कोराडी नाका, नागपुर, ३) आयुष उर्फ मोगली दिनेश वर्मा, वय २० वर्षे, रा. शांतीनगर व एक विधीसंघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेतले. त्यांना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद गुन्हा त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी यांचेसह संगणमताने केल्याची कबुली दिली. तसेच, त्यांनी वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे कळमना हद्दीत ईतर ठिकाणी ०१ घरफोडी व ०२ वाहनचोरी असे एकुण ०४ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यातील मुद्देमाल लाकडी पट्टी कापण्याची आरामशीन, ग्राइन्डर मशीन, मोबाईल फोन, सोन्याचा रवा, तसेच, होंडा स्प्लेंडर क्र. एम.एच. ४९ सि.ई.९७०१, ॲक्टीवा क्र. एम.एच. ४९ ए.वाय. २१६० असा एकुण १,२६,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, पोनि. गुन्हे करीम पठाण, पोउपनि. गजानन राऊत, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. नितीन मिश्रा, ललीत शेंडे, अविनाश ग्वालबंशी व रोशन निंबर्ते यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे कपीलनगर :— फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी धम्मदीप प्रविण खोब्रागडे, वय ३० वर्षे, रा. रानसिटी, सि.विंग, कपीलनगर, नागपूर यांचे पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत दिक्षित नगर, शॉप नं. ६ येथे युनिटी रिॲलीटीज कंपनीचे ऑफीस आहे. फिर्यादीचे फर्ममार्फत वेगवेगळ्या ठिकाणी प्रोजेक्ट चालतात. त्यांचे फर्ममध्ये काम करणारा निखील नरेंद्र आटोळे, वय ४० वर्षे, रा. त्रीमुर्ती नगर, लोखंडे नगर, रूद्रावन अपार्टमेंट, राणाप्रताप नगर, नागपुर याने दिनांक २२.०७.२०२६ ते दिनांक १५.०८.२०२६ रोजी दरम्यान, फिर्यादीचे फर्ममध्ये बनावट व खोटे कागदपत्रे दाखवुन, वेगवेगळ्या कामासाठी एकुण ३,५०,०००/—रू. ची उचल केली. परंतु त्याने उचल केलेल्या पैशातुन फर्मचे कोणतेही काम न करता, रकमेचा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता वापर करून, फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन, आर्थिक फसवणुक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे मपोउपनि. गजरे ९११२६६८२८६ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१८(४), ३३८, ३३६(३), ३४०(२), ३१९ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा :—** सय्यद सलीम सय्यद रफीक, वय ३५ वर्षे, रा. आझाद कॉलोनी, मोठा ताजबाग, सक्करदरा, नागपूर हे दिनांक २६.०६.२०२६ चे १८.०० वा. पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतील राहते घरून गावी जातो असे सांगुन कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले वा गावाला गेले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट १० इंच, केस— काळे, अंगात— काळ्या पांढऱ्या रंगाचा शर्ट व फुल पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. ओळख— लंगडत चालतात व अडखळत बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे गिट्टीखदान</u> :—** लवकुश अंजनी तिवारी, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. ३९, गजानन सोसायटी, गिट्टीखदान, नागपूर हा दिनांक १२.०८.२०२६ चे ०८.०० वा. पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला. नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>** रंग— गोरा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस— काळे, अंगात— लाल रंगाचे शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतो. ओळख— डोळ्यावर कट चे निशान आहे.



सय्यद सलीम



लवकुश

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**